# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

## **सांस्कृतिक विभाग**

लोकमत

# राजगुरू महाविद्यालयात 'ट्रॅडिशनल डे' साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात व्हॅलेंटाइन डे चे औचित्य साधून दि. १५ ते १७ फेब्रुवारी रोजी पारंपरिक पद्धतीने जल्लोषात ट्रॅडिशनल डे साजरा करण्यात आला.

या वेळी महाविद्यालयातील तरुणाई विविध रंगाच्या वेशभूषा, रंगभूषेने सजली होती. तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात हॅट डे, चॉकलेट डे, मास्क डे, गॉगल डे, बलून डे, रोझ डे, मिसमॅच डे, साडी डे, कोट डे आदी डेज उत्साहात साजरे झाले. शेवटच्या ट्रॅडिशनल डे च्या निमित्ताने आपले वेगळेपण सादर करण्याची संधी साधून विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक देखावे सादर केले.

अक्षय कदम, अमोल सस्ते व दिलीप करंडे या विद्यार्थ्यांनी तिरंग्याची वेषभूषा करून सामाजिक समता व देशभक्तीचा संदेश दिला.



**राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालय विद्यार्थ्यांनी ट्रॅडिशनल डे निमित्त ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक देखावे सादर केले.**

### पारंपारिक पोषाख

अनेक विद्यार्थी बैलगाडा, ट्रॅक्टर, दुचाकी, चारचाकी गाड्यांमधून मराठमोळ्या वेशात ढोलताशा व पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुकीसह यात सहभागी झाले. या तीन दिवसातील उत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून बिना मुलूक, उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून ज्ञानेश्वर गोरे तर यज्ञेश सुंबरे, गौरी कराळे यांच्या तृतीय वर्ष बीसीएच्या ग्रुपने सादर केलेला भारताच्या विविधतेने नटलेल्या संस्कृतीचा देखाव्याला उत्कृष्ट ग्रुप थीम म्हणून सन्मानित करण्यात आले.

हुतात्मा राजगुरुंच्या वेषभूषेत ज्ञानेश्वर गोरे, ऋषीच्या वेशात पुष्कर सूर्यवंशी, सैनिकाच्या वेशात सुमीत रत्नपारखी, महिलेच्या वेशात शुभम टाकळकर यांनी विशेष लक्ष वेधले.

अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी मराठी, गुजराती, बंगाली, दाक्षिणात्य व राजस्थानी अशा संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक पोषाखात आली होती.

Hello Pune Gramin
Page No. 3 Feb 20, 2018
Powered by: erelego.com

पुढारी पुणे, रविवार १८ फेब्रुवारी २०१८

# पारंपरिक रंगात रंगली तरुणाई

## राजगुरू महाविद्यालयात विविध दिनांचे आयोजन


राजगुरूनगर : प्रतिनिधी

राजगुरूनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पारंपरिक दिनानिमित्त विविध वेशभूषेत नटलेली तरुणाई शनिवारी (दि.१७) पाहायला मिळाली. निमित्त होते दरवर्षी व्हॅलेंटाइन डेच्या नंतर साजऱ्या होणाऱ्या पारंपरिक दिनाचे. गुरुवार (दि.१५) पासून शनिवार (दि.१७) पर्यंत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून विविध दिवस साजरे केले जातात. यामध्ये टोपी, चॉकलेट, मास्क, गॉगल, बलून, रोझ, मिसमॅच, साडी, कोट आदी दिवस उत्साहात साजरे करण्यात आले. शेवटच्या पारंपरिक दिनानिमित्ताने आपले वेगळेपण सादर करण्याची संधी साधून विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक देखावे सादर केले.

अक्षय कदम, अमोल सस्ते व दिलीप करंडे या विद्यार्थ्यांनी तिरंग्याची वेशभूषा करून सामाजिक समता व देशभक्तीचा संदेश दिला. हुतात्मा राजगुरूंच्या वेशभूषेत ज्ञानेश्वर गोरे, ऋषीच्या वेशात पुष्कर सूर्यवंशी, सैनिकाच्या वेशात सुमीत रत्नपारखी, महिलेच्या वेशात शुभम टाकळकर यांनी विशेष लक्ष वेधले. अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी मराठी, गुजराती, बंगाली, दाक्षिणात्य व राजस्थानी अशा संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक पोशाखात आले होते. तर अनेक विद्यार्थी बैलगाडा, ट्रॅक्टर, दुचाकी, चारचाकी गाड्यांमधून मराठमोळ्या वेशात ढोलताशा व पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुकीसह यात सहभागी झाले.

या तीन दिवसातील उत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून बिना मुलूक, उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून ज्ञानेश्वर गोरे तर यज्ञेश सुंबरे, गौरी कराळे यांच्या तृतीय वर्ष बीसीएच्या ग्रुपने सादर केलेला भारताच्या विविधतेने नटलेल्या संस्कृतीच्या देखाव्याला उत्कृष्ट ग्रुप थीम म्हणून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात भैरवनाथ ढोल लेझीम पथक सिरोली सहभागी झाले.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ. एन.एस. जे, प्रा.व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे यांच्या सहकार्याने विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर, प्रताप भुजबळ, हर्ष चौधरी, यज्ञेश सुंबरे, दत्ता शिंदे, सुशील शेटे, प्रतीक्षा गार्डे, सुमीत भुजबळ, सोमनाथ म्हसे, निकिता ढोरे, सलोनी वाडेकर, मोनिका नाईकरे या विद्यार्थ्यांनी सामूहिक प्रयत्नांनी तीन दिवसीय कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.



**हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पारंपरिक दिनानिमित्त विविध वेशभूषेतील सहभागी विद्यार्थी.**

प्रभात पुणे, सोमवार, दि. १९ फेब्रुवारी २०१८

# राजगुरू महाविद्यालयात ट्रॅडिशनल डे जल्लोषात

## विविध रंगांच्या वेशभूषा, रंगभूषेने सजली तरूणाई



राजगुरूनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात व्हॅलेंटाइन डेचे औचित्य साधून पारंपरिक पद्धतीने तरुणाईच्या जल्लोषात ट्रॅडिशनल डे साजरा करण्यात आला.

राजगुरूनगर, दि. १८ (प्रतिनिधी) - हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात व्हॅलेंटाइन डे चे औचित्य साधून दि. १५ ते १७ फेब्रुवारीदरम्यान पारंपरिक पद्धतीने तरुणाईच्या जल्लोषात ट्रॅडिशनल डे साजरा करण्यात आला. या वेळी महाविद्यालयातील तरुणाई विविध रंगाच्या वेशभूषा, रंगभूषेने सजली होती.

तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात हॅट डे, चॉकलेट डे, मास्क डे, गॉगल डे, बलून डे, रोझ डे, मिसमॅच डे, साडी डे, कोट डे आदि डेज उत्साहात साजरे झाले. शेवटच्या ट्रॅडिशनल डेच्या निमित्ताने आपले वेगळेपण सादर करण्याची संधी साधून विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक देखावे सादर केले. अक्षय कदम, अमोल सातो व दिलीप कांडे या विद्यार्थ्यांनी तिरंग्याची वेशभूषा करून सामाजिक समता व देशभक्तीचा संदेश दिला. हुतात्मा राजगुरूंच्या वेशभूषेत ज्ञानेश्वर गोरे, जवानांच्या वेशात पुष्कर सूर्यवंशी, सैनिकाच्या वेशात सुमीत रत्नपारखी, महिलेच्या वेशात शुभम टाकळकर यांनी विशेष लक्ष वेधले. अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मराठी, गुजराती, बंगाली, दाक्षिणात्य व राजस्थानी अशा संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक पोषाखात आली होती. तर अनेक विद्यार्थी बैलगाडा, ट्रॅक्टर, दुचाकी, चारचाकी गाड्यांमधून मराठमोळ्या वेशात ढोलताशा व पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुकीसह यात सहभागी झाले.

या तीन दिवसांतील उत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून किरा मुळूक, उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून ज्ञानेश्वर गोरे तर यशेश मुंढे, गौरी कराळे यांच्या तृतीय वर्ष बीसीएच्या ग्रुपने सादर केलेला भारताच्या विविधतेने नटलेल्या संस्कृतीचा देखाव्याला उत्कृष्ट ग्रुप थीम म्हणून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात भैरवनाथ ढोल लेझीम पथक विशेषतः सहभागी झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे यांच्या सहकार्याने विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर, प्रताप भुजबळ, हर्षद चौधरी, यशेश मुंढे, दत्ता शिंदे, सुशील शेटे, प्रतीक गाडे, सुमीत भुजबळ, सोमनाथ म्हसे, निकिता हगे, स्नेहल वाडेकर, मोनिका नाईकरे या विद्यार्थ्यांनी सामूहिक प्रयत्नांनी तीन दिवसीय कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

लोकमत पुणे, मंगळवार, दि. २० फेब्रुवारी २०१८

# राजगुरू महाविद्यालयात 'ट्रॅडिशनल डे' साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात व्हॅलेंटाइन डे चे औचित्य साधून दि. १५ ते १७ फेब्रुवारी रोजी पारंपरिक पद्धतीने जल्लोषात ट्रॅडिशनल डे साजरा करण्यात आला.

या वेळी महाविद्यालयातील तरुणाई विविध रंगाच्या वेशभूषा, रंगभूषेने सजली होती. तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात हॅट डे, चॉकलेट डे, मास्क डे, गॉगल डे, बलून डे, रोझ डे, मिसमॅच डे, साडी डे, कोट डे आदी डेज उत्साहात साजरे झाले. शेवटच्या ट्रॅडिशनल डे च्या निमित्ताने आपले वेगळेपण सादर करण्याची संधी साधून विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक देखावे सादर केले.



राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय विद्यार्थ्यांनी ट्रॅडिशनल डे निमित्त ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक देखावे सादर केले.

अक्षय कदम, अमोल सातो व दिलीप कांडे या विद्यार्थ्यांनी तिरंग्याची वेशभूषा करून सामाजिक समता व देशभक्तीचा संदेश दिला.

### पारंपारिक पोषाख

अनेक विद्यार्थी बैलगाडा, ट्रॅक्टर, दुचाकी, चारचाकी गाड्यांमधून मराठमोळ्या वेशात ढोलताशा व पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुकीसह यात सहभागी झाले. या तीन दिवसातील उत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून किरा मुळूक, उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून ज्ञानेश्वर गोरे तर यशेश मुंढे, गौरी कराळे यांच्या तृतीय वर्ष बीसीएच्या ग्रुपने सादर केलेला भारताच्या विविधतेने नटलेल्या संस्कृतीचा देखाव्याला उत्कृष्ट ग्रुप थीम म्हणून सन्मानित करण्यात आले.

हुतात्मा राजगुरूंच्या वेशभूषेत ज्ञानेश्वर गोरे, जवानांच्या वेशात पुष्कर सूर्यवंशी, सैनिकाच्या वेशात सुमीत रत्नपारखी, महिलेच्या वेशात शुभम टाकळकर यांनी विशेष लक्ष वेधले.

अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मराठी, गुजराती, बंगाली, दाक्षिणात्य व राजस्थानी अशा संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक पोषाखात आली होती.

सकाळ
पुणे, सोमवार
१९ फेब्रुवारी २०१८

## राजगुरू महाविद्यालयात 'ट्रॅडिशनल डे'

राजगुरुनगर, ता. १८ : येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून उत्साहात 'ट्रॅडिशनल डे' साजरा केला. विद्यार्थिनींनी नऊवारी साडी आणि स्वतः फेटा परिधान केला होता.

अक्षय कदम, अमोल सस्ते व दिलीप कांडे या विद्यार्थ्यांनी शिंप्याची वेशभूषा करून सामाजिक समता व देशभक्तीचा संदेश दिला. हुतात्मा राजगुरूंच्या वेशभूषेत ज्ञानेश्वर गोरे, ऋषीच्या वेशात पुष्कर सूर्यवंशी, सैनिकाच्या वेशात सुमीत रत्नपारखी, महिलेच्या वेशात शुभम टाकळकर यांनी विशेष लक्ष वेधले. अनेक विद्यार्थी बैलगाडा, ट्रॅक्टर, दुचाकी, चारचाकी गाड्यांमधून मराठमोळ्या वेशात ढोलताशा व पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुकीसह यात सहभागी झाले. या तीन दिवसांतील उत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून किरण मुळूक, उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून ज्ञानेश्वर गोरे यांना सन्मानित केले. पल्लवी मुंढे, गौरी कराळे यांच्या ग्रुपने सादर केलेल्या देखाव्याला उत्कृष्ट ग्रुप सीन म्हणून सन्मानित केले. या कार्यक्रमात मैत्रयाय ढोल लेझीम पथक शिरोली सहभागी झाले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, हरिदास खळदकर, प्रताप मुजकाड आदींनी संयोजन केले.



राजगुरुनगर : 'ट्रॅडिशनल डे'निमित्त बैलगाडीवर पारंपरिक वेशात सहभागी झालेल्या युवती.

केसरी पुणे, २२ फेब्रुवारी २०१८ ३

## राजगुरू महाविद्यालयात 'ट्रॅडिशनल डे' जल्लोषात साजरा

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पारंपरिक पद्धतीने तरुणाईच्या जल्लोषात 'ट्रॅडिशनल डे' साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील तरुणाई विविध रंगाच्या वेशभूषा आणि रंगभूषेने सजली होती. तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात हॅट डे, चॉकलेट डे, मास्क डे, गॉगल डे, बलून डे, रोझ डे, मिसमॅच डे, साडी डे, कोट डे उत्साहात साजरे झाले. अखेरच्या दिवशी आपले वेगळेपण सादर करण्याची संधी साधून विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक देखावे सादर केले. अक्षय कदम, अमोल सस्ते व दिलीप कांडे या विद्यार्थ्यांनी शिंप्याची वेशभूषा करून सामाजिक समता व देशभक्तीचा संदेश दिला. हुतात्मा राजगुरूंच्या वेशभूषेत ज्ञानेश्वर गोरे, ऋषीच्या वेशात पुष्कर सूर्यवंशी, सैनिकाच्या वेशात सुमीत रत्नपारखी, महिलेच्या वेशात शुभम टाकळकर यांनी विशेष लक्ष वेधले. अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी मराठी, गुजराती, बंगाली, दाक्षिणात्य व राजस्थानी अशा संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक पोशाखात आली होती. तर काही विद्यार्थी बैलगाडा, ट्रॅक्टर, दुचाकी, चारचाकीमधून मराठमोळ्या वेशात ढोलताशा व पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुकीसह यात सहभागी झाले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख